डेंग्यूचे लवकर निदान आवश्यक!


आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : ताप येणे सामान्य आहे, परंतु डेंग्यू आणि नेहमीच्या विषाणूजन्य तापामध्ये फरक आहे. दोन्ही आजार असताना समान लक्षणांसह सुरुवात होऊ शकते; परंतु त्याची मूलभूत यंत्रणा, जोखीम आणि निदान पद्धती भिन्न आहे. त्यामुळे या दोन्ही तापांमधील लक्षणे लवकर ओळखल्यास गुंतागुंत टाळण्यास मदत होऊ शकते, असे आरोग्यतज्ज्ञांनी म्हटले आहे.

'डेंग्यू चाचण्या व्हायरल तापापेक्षा वेगळ्या आहेत. बहुतेक विषाणूजन्य तापांचे विशेषतः विशिष्ट चाचणीशिवाय निराकरण होते. सामान्य तापाला सहसा विशेष तपासणीची आवश्यकता नसते, कारण ते स्वयं-मर्यादित असतात. डेंग्यूला मात्र लक्ष्यित निदानात्मक दृष्टिकोन आहे,' असे तज्ज्ञ स्पष्ट करतात.

डेंग्यूला विशिष्ट मार्कर असतात, म्हणूनच आम्ही सुरुवातीच्या काळात एनएस१ प्रतिजन सारख्या चाचण्यांवर अवलंबून असतो आणि नंतर आयजीएम किंवा आयजीजी या प्रतिपिंडविषयक चाचण्या आजारपणात संसर्गाची पुष्टी करण्यात आणि रोगाचा मागोवा घेण्यास मदत करतात. जेव्हा काही विशिष्ट धोक्याची लक्षणे दिसतात तेव्हा डेंग्यू चाचणी आवश्यक असते. उच्च ताप दोन ते तीन दिवस किंवा त्याहून जास्त काळ टिकल्यास विशेषतः पावसाळ्यात किंवा नंतर, डेंग्यू चाचणीचा विचार केला पाहिजे, असे तज्ज्ञांनी म्हटले.





डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर

ACIDITY तसेच सर्व आरोग्य तक्रारींवर महाकॅम्प

मोफत नाडी परिक्षण
FREE हेल्थ चेकअप

तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन.

आजच नाव नोंदवा

24 जानेवारी 2026
पुणे महाकॅम्प
वेळ : स. 11 ते रात्री 8 वा.
8591736700

दररोज
ठाणे
वेळ : स. 10 ते रात्री 8 वा.
9082911530

पदोन्नतीसाठी 'टीईटी' बंधनकारकच!

मुंबई : राज्यात शिक्षक संवर्गातून पदोन्नतीने पदे भरण्याच्या प्रक्रियेत आता शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने टीईटी उत्तीर्ण न झालेल्या शिक्षकांना पदोन्नती देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे पदोन्नती प्रक्रियेतील अनेक प्रकरणांवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

या निर्णयानंतर दोन वर्षांच्या कालावधीत टीईटी उत्तीर्ण न झाल्यास शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ देता येणार नाही. त्यानुसार पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) तसेच विस्तार अधिकारी या पदांवर पदोन्नती देताना टीईटीचा निकष लागू राहणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने पत्रात स्पष्ट केले आहे.

'तुमचे भवितव्य अंधकारमय'

'टीस'च्या नऊ विद्यार्थ्यांना न्यायालयाचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी. एन. साईबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमातील सहभागाबद्दल गुन्हा दाखल झालेल्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (टीआयएसएस) नऊ विद्यार्थ्यांना सत्र न्यायालयाने फटकारले. तसेच, या प्रकरणामुळे तुमचे करिअर उद्ध्वस्त होत असून त्यामुळे भविष्यातील संधींवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असा इशाराही न्यायालयाने या विद्यार्थ्यांना अटकेपासून दिलेले अंतरिम संरक्षण कायम ठेवताना दिला.

तुमच्यावर आता फौजदारी गुन्ह्याची नोंद झाली आहे, त्याची नोंद केवळ मुंबईतच नाही, तर देशभरातील सर्वच पोलिसांकडे राहणार आहे. तुमचे करिअर सुरू होण्यापूर्वीच तुम्ही एक मोठी चूक केली आहे, त्यामुळे तुमचे करिअर उद्ध्वस्त होत आहे, असेही अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनोज बी. ओझा यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या संरक्षणाची मुदत वाढवताना सुनावले. या नऊ विद्यार्थ्यांवर तुर्भे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जांवरील सुनावणी सत्र न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणी सोमवारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश ओझा यांच्यासमोर सुनावणी झाली. तुमच्यापैकी किती जण महाराष्ट्राबाहेरील आहेत? तुम्ही या सगळ्यासाठी शिकायला आला आहात का? किती जणांचे वडील सरकारी नोकरीत आहेत? अशी प्रश्नांची सरबत्ती करत न्यायालयाने या प्रकरणामुळे तुम्हाला सरकारी नोकऱ्या मिळणार नाहीत, असेही सुनावले.

हवेच्या 'मध्यम' गुणवत्तेबाबत महापालिकेवर ताशेरे


कारवाईच्या दाव्यावर उच्च न्यायालय असमाधानी

लोकसत्ता प्रतिनिधी

गेल्या वर्षी प्रदूषणात घट झाल्याची माहिती

२०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक २२ टक्के आणि २०२५ मध्ये २६ टक्के सुधारला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'प्राणा क्लीन एअर पोर्टल'वरील आकडेवारीनुसार, मुंबईमध्ये २०१७ वर्षापासून पीएम १० च्या पातळीत लक्षणीय घट झाल्याचेही महापालिकेने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. मुंबईत, समुद्रावरून जमिनीकडे वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रवाहाचा प्रभाव पडतो, याकडेही महापालिकेने नमूद केले आहे.

मुंबई : हवा प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केल्याचा आणि त्यामुळे मुंबईतीतील हवेचा दर्जा मध्यम पातळीवर असल्याचा दावा मुंबई महानगरपालिकेने मंगळवारी उच्च न्यायालयात केला. त्यावर, आपल्याला मुंबईतील हवेची गुणवत्ता मध्यम दर्जाची नको आहे, असे महापालिकेला सुनावून न्यायालयाने हवेच्या गुणवत्तेबद्दल असमाधान व्यक्त केले.



नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा अहवाल महापालिकेने सादर केल्यानंतर मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने मुंबईतील हवेच्या गुणवत्तेबाबत महापालिकेच्या वकिलांना विचारणा केली. तेव्हा मुंबईतील हवेचा दर्जा सध्या मध्यम पातळीवर असल्याचे महापालिकेच्या वतीने वरिष्ठ वकील एस. यू. कामदार यांनी सांगितले. महापालिकेच्या 'समीर' ॲपनुसार, गेल्या आठवड्यात मुंबईतील हवेची गुणवत्ता १०१ ते ११६ दरम्यान होती. त्यामुळे, हवेची गुणवत्ता ही 'मध्यम' राहिली असल्याचा दावाही कामदार यांनी केला. त्यावर, उच्च न्यायालयाने असमाधान व्यक्त केले.

मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा!

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई शहर व उपनगरातील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली असून समीर ॲपच्या नोंदीनुसार, रविवारपासून शहराचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक 'समाधानकारक' श्रेणीत नोंदला जात आहे. मंगळवारीदेखील शहरातील हवेने 'समाधानकारक' श्रेणीचीच नोंद केली. यामुळे सध्या तरी मुंबईकरांना प्रदूषित हवेपासून तात्पुरता दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

सध्या मुंबईत वाऱ्यांचा वेग वाढल्याने त्याचा परिणाम हवेवर झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जानेवारीच्या सुरुवातीला पडलेल्या पावसामुळे हवा गुणवत्तेत सुधारणा झाली होती. मात्र त्यानंतर पुन्हा हवा प्रदूषणात वाढ झाली होती.



केवळ चार विभाग 'मध्यम' श्रेणीत

मंगळवारी शहराचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक 'समाधानकारक' श्रेणीत म्हणजेच ८८ इतका नोंदला गेला. समीर ॲपच्या नोंदीनुसार, सध्या शहरात हवा प्रदूषणाचे मोजमापन करणारी एकूण २४ स्थानके आहेत. त्यापैकी २० स्थानकांवरील हवा 'समाधानकारक', तर वांद्रे कुर्ला संकुल, देवनार, कुर्ला आणि शिवडी या चार स्थानकांवरील हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली.

कुर्ला, अंधेरी, चेंबूर भागातील 'म्हाडा'च्या झोपु योजनांना मंजुरी

मुंबई : रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजना पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने विविध प्राधिकरणांवर सोपविलेल्या संयुक्त भागीदारी प्रकल्पाअंतर्गत 'महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा'ने (म्हाडा) सादर केलेल्या कुर्ला, अंधेरी, चेंबूरमधील तीन योजनांना झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मंजुरी दिली. मुंबईतील रखडलेल्या २२८ झोपु योजनांची जबाबदारी राज्य शासनाने विविध प्राधिकरणांवर सोपविली आहे. या योजना संयुक्त भागीदारीत राबवायच्या असून त्यासाठी झोपु प्राधिकरणावरच नियोजन प्राधिकरण म्हणून जबाबदारी आहे. त्यातील २१ योजनांचा पुनर्विकास म्हाडाकडून केला जाणार आहे. यापैकी म्हाडाने दाखल केलेल्या साईबाबा वेल्फेअर (जोगेश्वरी पूर्व), जागृती (चेंबूर) आणि श्रमिक (नेहरुनगर, कुर्ला) या गृहनिर्माण संस्थांना प्राधिकरणाने इरादापत्र जारी केले.

इमारतींच्या 'ओसी'साठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आवश्यक

लोकसत्ता प्रतिनिधी

उच्च न्यायालयाचे सर्व नागरी प्राधिकरणांना आदेश

मुंबई : विकासक बांधकाम परवान्यांचे पूर्णपणे पालन करत नाहीत आणि योग्य सांडपाणी व्यवस्थापनाची खात्री करत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही इमारतीला निवासी प्रमाणपत्र (ओसी) दिले जाऊ नये, असे आदेश उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व नागरी प्राधिकरणांना दिले.

कुळगाव-बदलापूर येथील ४३८ अनधिकृत इमारतींमध्ये योग्य सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधले नसल्यामुळे सर्व इमारतींतील सांडपाणी उल्हास नदीत सोडले जाते. यामुळे निर्माण झालेल्या व्यापक समस्येची दखल घेताना, न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले.



विकासकाने केलेल्या बेकायदेशीर बांधकामांचा मुद्दा बदलापूरस्थित रहिवाशाने याचिकेद्वारे उपस्थित केला होता. या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने उल्हास नदीत सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व ते थांबवण्यासाठी नगर परिषदेने युद्धपातळीवर उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अशा सर्व इमारतींचा आढावा घेण्यासाठी मोहीम सुरू करण्याचे आदेशही न्यायालयाने अधिकाऱ्यांना दिले.

विकासकावर कारवाईचे निर्देश

विकासक किंवा बांधकाम कंपन्या इमारतींसाठी एसटीपी किंवा सांडपाणी व्यवस्थापन उपलब्ध करत नाहीत, त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले. अशा इमारतींना निवासी प्रमाणपत्र दिल्याचे आढळल्यास, केवळ विकासकाला काळ्या यादीत टाकणार नाही, तर संबंधित नागरी प्राधिकरणांवरही कारवाई करेल, असा इशाराही न्यायालयाने दिला.

मुंबई पत्तन प्राधिकरण

निविदा आमंत्रण सूचना

मुंबई पत्तन प्राधिकरण, ऑनलाईन **निविदा क्रमांक इ-८२/२०२५** द्वारे, **हे बंदर येथील शेड क्रमांक १, २ आणि कस्टम शेड आणि हाजी बंदर, जीडब्ल्यूएनडी येथील सी-शेडमधील तोडलेली सामग्री खरेदी, पाडणे आणि काढून टाकण्यासाठी** ई-निविदा-सह-ई-लिलाव आमंत्रित करत आहे. **निविदेची अंतिम तारीख ०९/०२/२०२६ आहे.** निविदा माहिती एमबीपीएच्या वेबसाईट **http://www.mumbaiport.gov.in** आणि **http://www.eprocure.gov.in/eprocure/app** वर उपलब्ध आहे.

मुख्य अभियंता (प्रभारी)
मुंबई पत्तन प्राधिकरण

MbPA-43-2025

बँक ऑफ़ इंडिया Bank of India BOI

मुख्य कार्यालय

ट्रान्झॅक्शन मॉनिटरिंग आणि केवायसी/एएमएल विभाग

खुल्या निविदेसाठी (ओपन टेंडर) सूचना

बँक ऑफ इंडिया त्यांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी अभिप्राय अभ्यासासाठी खुल्या निविदा आमंत्रित करत आहे. यासाठीची आरएफपी बँकेच्या वेबसाइटवर दि.२१.०१.२०२६ पासून अपलोड केली आहे आणि बोली सादर करण्याची अंतिम तारीख १०.०२.२०२६, संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी, कृपया बँक ऑफ इंडियाची अधिकृत वेबसाइट www.bankofindia.bank.in वर BOI>Important Links>Tender ला भेट द्या.

'पीएमएवाय'साठी आरक्षण रद्द करण्याच्या हालचाली

केंद्राच्या नियमानुसार निर्णय प्रक्रियेला म्हाडाकडून सुरुवात

मंगल हनवते, लोकसत्ता

मुंबई : केंद्र सरकारच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत (पीएमएवाय) म्हाडाकडून राज्यभर घरांची निर्मिती केली जात आहे. या घरांची विक्री सोडत प्रक्रियेने करताना काही मंडळातील सामाजिक आरक्षणातील घरे मोठ्या संख्येने विक्रीवाचून रिक्त राहत आहेत. त्यामुळे आता मंडळाने पीएमएवाय योजनेतील घरांसाठीचे सामाजिक आरक्षण रद्द करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारच्या योजनेत कुठेही या घरांची विक्री सामाजिक आरक्षणानुसार करण्याचे निर्देश नसल्याचे स्पष्ट करत यासंबंधीचा अंतिम निर्णय घेण्याची तयारी मंडळाने सुरू केली आहे.

धोरणात्मक निर्णयासाठी पडताळणी



म्हाडा कायद्यानुसार इतर आरक्षित घटकासाठी (पत्रकार, कलाकार, स्वातंत्र्यसैनिक आदी) अर्ज न आल्यास या घरांचे वितरण सर्वसाधारण घटकाला करता येते. मात्र सामाजिक आरक्षणातील घरे इतर घटकांना देता येत नाहीत. पण पीएमएवाय योजनेत कोणतेही प्रवर्गनिहाय आरक्षण नाही. त्यामुळेच पीएमएवायसाठीचे सर्व प्रकारचे आरक्षण रद्द करण्यात येणार आहे. याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाबाबत पडताळणी करून अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकाला परवडणाऱ्या दरात घरे देण्यासाठी म्हाडा कायद्यात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सोडतीतील काही घरे १५ प्रकारच्या प्रवर्गांसाठी राखीव ठेवली जातात. त्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती आणि विमुक्त जमाती या चार प्रवर्गांचा समावेश आहे. मात्र ही प्रक्रिया राबवूनही मागील काही वर्षांपासून कोकण मंडळाच्या सोडतीतील घरे मोठ्या संख्येने रिक्त राहत आहेत. महागड्या घरांसह अन्य काही कारणे यामागे असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे आता सामाजिक आरक्षण पीएमएवायच्या घरांसाठी रद्द करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार (₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	१२,१३०	६,९२०	६,०९७	२६,१०१	१७,८९०	२३,८९७
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	९,५१९	४,२६५	३,७५९	१८,४७७	११,०५५	१४,३३६
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	९,५१९	४,२६५	३,७५९	१८,४७७	११,०५५	१४,३३६
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	९,५२८	४,२६२	३,७३९	१८,४८३	११,०३५	१४,३२७
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	९,५३१	४,२७४	३,७०९	१८,४६८	११,००७	१४,२९७
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(३,९८६)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत आणि सौमिकृत (₹)	३.९७	१.७८	१.५६	७.७०	४.६०	५.९७

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीने केले आहे आणि संचालक मंडळाने दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी झालेल्या सभेत त्यांना मान्यता दिली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा
किंवा: https://www.mcxccl.com/disclosures/financial-results ला भेट द्या.

स्थळ: मुंबई
दिनांक: २० जानेवारी २०२६

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी



BAJAJ BEYOND

जमनालाल बजाज पुरस्कार

नामांकन आमंत्रित करण्यात येत आहेत

४८ वा जमनालाल बजाज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार - २०२६
गांधीवादी 'योद्ध्यांसाठी'



रचनात्मक कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार

ग्रामीण भारतामध्ये स्वयंपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी महात्मा गांधींच्या कोणत्याही किंवा सर्व विकास क्षेत्रांमधील योगदानासाठी.

असामान्य पुरुष – जमनालाल बजाज हे असे एक दृढनिश्चयी व्यक्ती होते ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी आपले सर्वस्व अर्पण केले. खादीचा प्रचार, दलित कल्याण, स्त्री मुक्ती, व्यवसायामधील नीतिमत्ता, किंवा गोसेवेच्या माध्यमातून पशू संपत्तीचे जतन अशा महात्मा गांधी ने सांगितलेल्या विविध विधायक कार्यक्रमांची अंमलबजावणी करून जमनालाल बजाज ने आपल्या शब्दांना कृतीची जोड दिली. म्हणूनच त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन महात्मा गांधी ने त्यांना आपला 'पाचवा पुत्र' मानला.

पुरस्कार – जमनालाल बजाजांची परोपकाराची परिकल्पना तसेच ग्रामीण विकासाची महात्मा गांधी चे विचारधारा ह्यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, जमनालाल बजाज फाउंडेशन संस्थेने चार पुरस्कारांची स्थापना केली आहे, ज्यांना संबंधित क्षेत्रातील अत्यंत मानाच्या पुरस्कारांचा गौरव प्राप्त झालेला आहे.

प्रत्येक पुरस्कारामध्ये समाविष्ट आहे
रोख रक्कम ₹२० लाख | ट्रॉफी | प्रशस्तिपत्र



ग्रामीण विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा व्यावहारिक उपयोगासाठी राष्ट्रीय पुरस्कार

अनुकूलनक्षम, किफायतशीर आणि अनुकरणीय अशा तळागाळातील सुयोग्य तंत्रज्ञानाच्या योगदानासाठी, ज्याची परिणती ग्रामीण लोकांच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासामध्ये झाली आहे.



महिला आणि बालकांच्या विकास एवं कल्याणासाठी राष्ट्रीय पुरस्कार

केवळ महिलेसाठी.

महिला व मुलांचे शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, आरोग्यदेखभाल, साक्षरता, उपजीविका कार्ये, सर्वांगीण विकास, समर्थन इत्यादींप्रती योगदान.



परदेशात गांधीजींच्या तत्वांच्या प्रसारासाठी आंतरराष्ट्रीय पुरस्कार

केवळ विदेशी नागरिकासाठी.

शांतीची परिकल्पना, अहिंसा, निसर्ग व सदसद्विवेकबुद्धी ह्यांच्या साथीने मानवी जीवनामध्ये सुसंवाद इत्यादीं गांधीवादी मुल्यांचा प्रचार करण्यामध्ये भारताबाहेरील योगदानासाठी.

नामांकनासाठी 11 दिवस शिल्लक

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार: ३१ जानेवारी, २०२६

ऑनलाइन सादर करण्यासाठी: www.jamnalalbajajawards.org/nomination-forms

ईमेल(नामांकनासाठी): nominations@jamnalalbajajfoundation.org

Jamnalal Bajaj Foundation
Bajaj Bhawan, Jamnalal Bajaj Marg,
226 Nariman Point, Mumbai 400 021
Phone: 022 - 69424200 / 22023626

Visit
www.jamnalalbajajfoundation.org
www.jamnalalbajajawards.org
www.bajajgroup.company
www.bajajbeyond.co.in